कारणे

गुण क्र. १ ते ५ :- सर्व गुण एकत्रीत रित्या कारणे देण्यास घेतले,पुर्नरावृती म्हणजेच तेच ते वारंवार उल्लेख टाळण्यासाठी व सोईस्करअसल्यामुळे एकत्रीत रित्या निष्कर्षासाठी घेण्यात आले व प्रत्येक गुणापुढे खालील दिलेल्या कारणास्तव निष्कर्ष नोंदवले आहेत.

उभय पक्षांच्या तक्रार व खुलासा दाखल कलेले पत्र व टेस्ट रिर्पोट नुसार ग्राहकाच्या दि.०३.०५.२०१७ व ०७.११.२०१७ रोजीच्या लिखीत तक्रारीची दखल महावितरण कंपनीने घेतली नाही. तसेच अर्जदाराचा विद्यूत पुरवठा बंद करत असताना विद्यूत कायदा २००३ कलम ५६.(१) याचे पालन केले नाही हे स्पष्ट होते. युक्तीवादक गैरअर्जदारातर्फे असे दर्शविण्यात आले की, उपविभागीय कार्यालयाकडून सदरचे नोटीस शाखाकार्यालयाकडे सुर्पूत केली ती बजावली असल्याचे खात्री करुन घेतली नाही. कलम ५६.(१) विद्युत कायदा २००३ अन्वये कालावधी हा नोटीस बजावणी पासुन, स्पष्ट पधंरा दिवसाचा असुन, तो पाळला गेला नाही हे स्पटीकासारखे स्वच्छ दिसुन येते. त्यामुळे खालील बाबींचा उल्लेख होणे गरजेचे आहे.

१) Flash कंपनीचा मीटर त्वरीत बदलावा या सबंधी मुख्यकार्यालयाच्याआदेशाची पडताळणी होणे क्रमप्राप्त होते. याबाबत गैरअर्जदार यांनी कोणतेही भाष्य केले नाही. या व्यतीरिक्त केवळ टेस्टींगबेंचचा टेस्ट रिर्पोटवरती निर्भर करुन मीटर सुस्थीतीत आहे हे म्हणने योग्य नाही. याकृतीस दुर्लक्ष करता येणार नाही. ही बाब गंभीर आहे.

२) मंचाच्या दि.२०.०२.२०१८ च्या अंतरीम आदेशानुसार बसवलेल्या सेरीज मीटरचे वाचन हे प्रतिदिन १.५६ युनीट कमी दाखवत आहे. तरी ग्राहकाचे बील दुरुस्त करुन देण्यात यावे त्यास कोणतेही व्याज दंड लावता येणार नाही. ही बाब मंचाच्या निर्दशनास आलेली आहे. त्यामुळे जुने मीटर बदलने आवश्यक वाटते.

३) MERC च्या कृती व मानके २०१४ नुसार कलम ६ (II) (ii) ग्राहकाच्या दि.०३.०५.२०१७ रोजी च्या अर्जानुसार नुकसान भरपाई देणे योग्य आहे.

४) ग्राहकाचा विद्युत पुरवठा खंडीत करत असताना विद्युत कायदा २००३ कलम ५६(१) कारवाई न केल्याचे दिसुन येते. त्याकलमात नोटीस बजावणीची नितांत गरजेचे दर्शवीले आहे. या प्रकरणात महावितरणच्या वतीने बजावणीची काळजी घेतली गेली नाही. तर ग्राहकाच्या पुढील हक्काचा म्हणजेच under protest बील जमा करण्याचा हक्काचा विचार केला नाही.

५) अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर यांनी या तक्रारीबाबत सखोल चौकशी करणे गरजेचे होते तसे केले नाही त्यामुळे न्याय व योग्य आदेश पारीत केला नाही.

या सर्व वरील कारणावरुन तक्रारदाराच्या तक्रारीत तथ्य आढळतात व गैरअर्जदार यांच्या म्हणण्यात व युक्तीवादात कसलाच कायदेशीर न्याय व योग्य असे स्पष्टीकरण दिसत नाही. या उलट महावितरण कंपनीच्या वतीने जी कायदेशीर जबाबदारीचे अनुपालन केले नाही हे स्पष्ट होत आहे. वरील कारणामुळे सर्व गुणांच्या समोर निष्कर्ष खुलाशेवार नोंदवल्याचे येथे सुचीत करत आहोत. गुण क्र.२ व ३ वर निष्कर्ष होकारअर्थी देण्यात आला आहे. १ व ४ वर नकारअर्थी देण्यात आले तसेच शेवटच्या गुणावर शेवटी आदशे केल्याप्रमाणे असा उल्लेख करण्यात आला.